"A++" *Accredited by* NAAC (2021) With CGPA-3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

### प्रवेश सूचना २०२६-२७

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रांतर्गत विद्यापीठ अनुदान आयोग मान्यताप्राप्त बी.ए., बी.कॉम., एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, राज्यशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र व समाजशास्त्र) तसेच एम.कॉम, एम.एस्सी. (गणित) या दूरशिक्षण अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्रवेश अर्ज दि. २२/०४/२०२६ पासून ऑनलाईन पद्धतीने मागविण्यात येत आहेत.

इच्छुक विद्यार्थ्यांनी आपले प्रवेश अर्ज https://sukapps.unishivaji.ac.in/stud-reg/#/login या संकेतस्थळावरील Student Registration Portal वरून ऑनलाईन पद्धतीने सादर करावेत.

प्रवेश अर्ज भरताना व सादर करताना खालील सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे.

**प्रवेश अर्ज संबंधित महत्त्वाच्या सूचना :**

१. प्रत्येक विद्यार्थ्यांकडे स्वतःचा ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक असणे आवश्यक आहे.

२. विद्यार्थ्यांनी स्वतःचा ई-मेल आयडी हा User ID म्हणून वापरून पासवर्ड तयार करावा व आपली नोंदणी करावी.

३. Registration पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी त्याच User ID (ई-मेल आयडी) द्वारे प्रवेश अर्ज भरावा. पुढील शैक्षणिक, परीक्षा व इतर सर्व कामकाजासाठी हाच ई-मेल आयडी वापरण्यात येईल.

४. विद्यार्थ्यांनी नोंदविलेला मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी कार्यरत ठेवणे आवश्यक आहे. विद्यापीठाकडील सर्व सूचना त्याद्वारे पाठविण्यात येतील.

५. प्रवेश अर्ज व शुल्क ऑनलाईन पद्धतीने सादर केल्यानंतर विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जाची प्रिंट घेऊन त्यावर स्वाक्षरी करावी.

६. प्रवेश अर्जासोबत पात्रता पूर्ण करणाऱ्या कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित छायांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. शैक्षणिक अर्हता/पात्रता कोणतीही मूळ कागदपत्रे जोडू नयेत.

७. प्रवेश अर्जासोबत नमूद केलेली सर्व कागदपत्रे विहित मुदतीत संबंधित अभ्यासकेंद्रात जमा करणे आवश्यक आहे. अन्यथा प्रवेश निश्चित / अंतिम समजला जाणार नाही.

८. बी.ए., बी.कॉम. प्रथम वर्षासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी १२ वी उत्तीर्ण गुणपत्रिका (झेरॉक्स) व शाळा सोडल्याचा (मूळ) दाखला जोडणे आवश्यक आहे.

९. एम.ए., एम.कॉम. व एम.एस्सी. (गणित) प्रवेशासाठी पदवी उत्तीर्ण गुणपत्रिका (झेरॉक्स) जोडणे आवश्यक आहे.

१०. प्रवेशित विद्यार्थ्यांनी संस्थांतर दाखला (T.C.) तसेच लागू असल्यास स्थलांतर दाखला (M.C.) जोडणे आवश्यक आहे.

११. संस्थांतर दाखला (T.C.) किंवा स्थलांतर दाखला (M.C.) उपलब्ध नसल्यास प्रवेश अर्ज तात्पुरता स्वीकारला जाईल; मात्र आवश्यक कागदपत्रे एक महिन्याच्या आत सादर करणे बंधनकारक राहील.

१२. संस्थांतर दाखला (T.C.) उपलब्ध नसल्यास संबंधित विद्यार्थ्यांनी हमीपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१३. प्रवेश अर्जासोबत जोडलेल्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती पडताळणीसाठी मागविल्यास सादर कराव्यात,

१४. विद्यार्थ्यांनी निवडलेले अभ्यासकेंद्र हेच परीक्षा केंद्र असेल. त्यामुळे अभ्यासकेंद्र निवडताना त्याची काळजीपूर्वक निवड करावी. एकदा निवडलेले अभ्यासकेंद्र पुन्हा बदलता येणार नाही.

१५. प्रवेश अर्ज व प्रवेश शुल्क हे विद्यार्थ्यांनी स्वतःच्या लॉगिनमधून ऑनलाईन पद्धतीने भरावेत. इतर कोणत्याही माध्यमातून भरलेले शुल्क ग्राह्य धरले जाणार नाही.

१६. प्रवेश अर्ज भरताना विद्यार्थ्यांनी गुणपत्रिकेप्रमाणे आपले नाव अचूक भरावे. तसेच पत्ता, अभ्यासकेंद्राचे नाव, ई-मेल आयडी, मोबाईल क्रमांक, आधार क्रमांक, ABC व DEB आयडी इत्यादी माहिती काळजीपूर्वक भरावी.

१७. विद्यार्थ्यांनी प्रवेशापूर्वी ABC ID तयार करून त्याची माहिती प्रवेश अर्जात अचूक नमूद करावी.

१८. विद्यार्थ्यांनी DigiLocker मध्ये आवश्यक शैक्षणिक कागदपत्रे अद्ययावत ठेवावीत.

१९. प्रवेश, पात्रता, परीक्षा व इतर अनुषंगिक बाबींसाठी विद्यार्थ्यांनी संबंधित अभ्यासकेंद्राशी सातत्याने संपर्क ठेवावा.

२०. प्रवेश, पात्रता, परीक्षा व इतर बाबींशी संबंधित सूचना विद्यापीठाच्या **https://www.unishivaji.ac.in/distedu/** या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी नियमितपणे संकेतस्थळ पाहणे आवश्यक आहे.

२१. या केंद्राच्या मुख्यालयात विषयानिहाय तज्ज्ञ प्राध्यापक कार्यरत असून विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने विषयानिहाय मार्गदर्शन केले जाते. विद्यार्थ्यांनी अभ्यासकेंद्र व संबंधित विषय शिक्षकांच्या संपर्कात राहावे.

२२. दुहेरी पदवी योजनेंतर्गत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी दुहेरी पदवी अर्ज व रु. १०००/- शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरावे. संबंधित कागदपत्रे विहित मुदतीत मुख्यालयात/विभागीय केंद्रात/ अभ्यासकेंद्रामध्ये जमा करावीत.

**प्रवेश अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे :**

१. पात्रतेनुसार गुणपत्रिकेची छायांकित प्रत.

२. संस्थांतर दाखला (T.C.)

३. स्थलांतर दाखला (M.C.) - लागू असल्यास.

४. संस्थांतर दाखला उपलब्ध नसल्यास हमीपत्र.

५. आधार कार्ड प्रत.

६. ABC ID प्रत (नसल्यास DigiLocker App द्वारे तयार करावी).

७. DEB ID प्रत.

८. ऑनलाईन प्रवेश अर्ज व शुल्क पावती.

९. दुहेरी पदवी योजनेंतर्गत प्रवेश घेतल्यास संबंधित अर्जाची प्रत व शुल्क पावती.

**परीक्षा संदर्भातील सूचना :**

२३. विद्यार्थ्यांनी परीक्षा विभागाच्या सूचनेनुसार प्रत्येक सत्रासाठी स्वतंत्र परीक्षा अर्ज व शुल्क स्वतःच्या लॉगिनमधून भरावे. विहित मुदतीत परीक्षा अर्ज न भरल्यास विद्यार्थ्यांना परीक्षेस बसता येणार नाही.

२४. प्रवेशावेळी वापरलेल्या User ID (ई-मेल आयडी) द्वारेच परीक्षा अर्ज भरावेत.

२५. विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरताना विषय निवड काळजीपूर्वक करावी. एकदा परीक्षा अर्ज भरल्यानंतर पुन्हा विषय बदलता येणार नाही.

२६. एकदा भरलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीत परत केले जाणार नाही.

२७. परीक्षा वेळापत्रक, हॉलतिकीट, निकाल व इतर सूचना विद्यापीठाच्या https://www.unishivaji.ac.in/exam/ या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येते. याबाबत विद्यार्थ्यांनी वेळोवेळी सजग रहावे.

२८. विद्यार्थ्यांनी परीक्षा व प्रवेश संदर्भातील सर्व सूचनांसाठी आपल्या अभ्यासकेंद्राशी संपर्क ठेवावा.

२९. प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची माहिती डी.ई.बी., विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांना सादर केली जाते. त्यामुळे सर्व अचूक माहिती सादर करणे बंधनकारक आहे.

**शुल्क व ऑनलाईन व्यवहार संदर्भातील सूचना :**

३०. विद्यार्थ्यांनी प्रवेश शुल्क भरल्यानंतर त्याची ऑनलाईन पावती डाउनलोड करून स्वतःजवळ जतन करुन ठेवावी. भविष्यातील पडताळणीसाठी सदर पावती आवश्यक राहील.

३१. ऑनलाईन शुल्क भरताना व्यवहार अयशस्वी (Failed Transaction) झाल्यास पुन्हा शुल्क भरण्यापूर्वी व्यवहार स्थिती तपासावी. दुबार शुल्क भरल्यास त्याबाबतची जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील,

३२. विद्यार्थ्यांनी स्वतःचे Login ID व Password गोपनीय ठेवावेत. त्याद्वारे झालेल्या सर्व व्यवहारांची जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यांची राहील.

**प्रवेश रद्द व शुल्क परतावा :**

३३. प्रवेश रद्द करावयाचा असल्यास विद्यार्थ्यांनी विद्यापीठ अनुदान आयोग (UGC-DEB) व विद्यापीठाच्या नियमांनुसार विहित मुदतीत अर्ज सादर करावा.

३४. प्रवेश रद्द करण्यासाठी विद्यार्थ्यांनी विहित अर्जासोबत शुल्क पावती, प्रवेश अर्जाची प्रत व बँक खात्याचा तपशील सादर करणे आवश्यक राहील,

३५. विद्यापीठ अनुदान आयोग (UGC-DEB) व विद्यापीठाच्या नियमांनुसारच शुल्क परतावा करण्यात येईल. विहित मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**Pursuing Two Academic Programmes Simultaneously (Dual Degree- दुहेरी पदवी) संदर्भातील सूचना :**

३६. दुहेरी पदवी योजनेंतर्गत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी UGC-DEB, शासन व विद्यापीठ यांचेकडून प्राप्त होणाऱ्या नियमांचे पालन करणे आवश्यक राहील.

३७. दुहेरी पदवी योजनेंतर्गत प्रवेश घेताना संबंधित दुसऱ्या अभ्यासक्रमामधील प्रवेशाची माहिती व आवश्यक कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहील.

३८. दुहेरी पदवी योजनेंतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी वेळापत्रक, परीक्षा व अभ्यासक्रम समन्वयाची जबाबदारी स्वतः पार पाडावी.

**इतर सूचना :**

३९. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रमात बदल झाले असल्यास विद्यार्थ्यांनी प्रवेशापूर्वी संबंधित विषय शिक्षकांकडून माहिती व मार्गदर्शन घ्यावे.

४०. पूर्वीच्या प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी पुढील वर्षाचा प्रवेश अर्ज व शुल्क पूर्वीच्या लॉगिनद्वारे भरावे.

४१. विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रियेतील सर्व नियम, अटी व विद्यापीठाने वेळोवेळी जारी केलेल्या सूचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.

४२. प्रवेश प्रक्रियेदरम्यान चुकीची अथवा खोटी माहिती सादर केल्यास विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द करण्याचा अधिकार विद्यापीठास राहील,

४३. विद्यार्थ्यांनी अंतिम प्रवेश अर्ज सबमिट करण्यापूर्वी सर्व माहिती काळजीपूर्वक तपासावी. अंतिम माहिती सबमिट झाल्यानंतर त्यामध्ये कोणताही बदल करता येणार नाही.

४४. प्रवेश प्रक्रियेसंदर्भातील सर्व अंतिम अधिकार दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्याकडे राहतील.

**Sd/-**
**उपकुलसचिव**
**दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

**जा.क्र. सी.डी.ओ.ई.\ 317**
**दिनांक : 18 M... 2026**